# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

## दिनांक:23.03.2026 वारः सोमवार

---

1. पश्चिम आशियातील तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची उच्चस्तरीय बैठक
2. निसर्गोपचार आश्रमाने शारीरिक मानसिक आरोग्याबरोबरच ग्रामीण विकासातही मोलाचं योगदान दिल्याचे उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांचे गौरवोद्गार
3. संसदेत आज 'कॉर्पोरेट कायदे दुरुस्ती विधेयक आणि सशस्त्र पोलीस दल विधेयक सादर होणार
4. अमेरिकेनं इराणच्या वीज प्रकल्पांवर हल्ला केल्यास होरमुझची सामुद्रधुनी पूर्णपणे बंद केली जाईल-इराणचा इशारा आणि
5. 'स्पॅनिश पॅराबॅडमिंटन' स्पर्धेत भारतीय खेळाडूंचं वर्चस्व

**<u>पंतप्रधान</u>**

पश्चिम आशियातील तणावाच्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल उच्चस्तरीय बैठक घेतली. यामध्ये देशातील पेट्रोलियम, कच्चं तेल, वायू, वीज आणि खतांच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्यात आला. देशभरात या सर्व अत्यावश्यक वस्तूंचा अखंडित पुरवठा, त्यासाठीची वाहतूक व्यवस्था आणि वितरण सुनिश्चित करण्यावर यावेळी विशेष भर देण्यात आला. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर, यांच्यासह अनेक केंद्रीय मंत्री या बैठकीला उपस्थित होते. नागरिकांना कमीत कमी गैरसोय व्हावी यासाठी शासनाच्या सर्व विभागांनी एकत्रितपणे काम करावं तसंच महत्त्वाच्या वस्तूंचा काळाबाजार आणि साठेबाजी होऊ नये यासाठी राज्य सरकारांशी योग्य समन्वय ठेवावा असंही पंतप्रधान मोदी यांनी या बैठकीत सांगितलं.

**<u>संसद</u>**

केंद्रीय वित्त आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्री निर्मला सीतारामन आज लोकसभेत 'कॉर्पोरेट कायदे दुरुस्ती विधेयक, 2026' सादर करणार आहेत. या विधेयकाद्वारे 'मर्यादित दायित्व भागीदारी कायदा, 2008 आणि 'कंपनी कायदा, 2013' मध्ये सुधारणा करण्याचा उद्देश आहे. याव्यतिरिक्त, 'वित्त विधेयक, 2026 देखील सभागृहाच्या आजच्या कामकाजात विचारार्थ आणि मंजुरीसाठी समाविष्ट करण्यात आलं आहे. तर राज्यसभेत आज केंद्रीय गृहमंत्री अमित शाह 'केंद्रीय सशस्त्र पोलीस दल सामान्य प्रशासन विधेयक, 2026' सादर करणार आहेत. केंद्रीय सशस्त्र पोलीस दलांमधील 'गट अ' मधील 'सामान्य कर्तव्य अधिकारी आणि इतर अधिकाऱ्यांची भरती तसंच सेवेच्या शर्तींशी संबंधित सामान्य नियमांचं तसंच या दलांशी संबंधित इतर नियमांचं नियमन करणं हा या विधेयकाचा उद्देश आहे.

**<u>उपराष्ट्रपती</u>**

निसर्गोपचार, निसर्गाशी साहचर्य राखणाऱ्या जीवनशैलीला प्रोत्साहन देत असल्याचं, उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. पुण्याजवळच्या उरुळी कांचन इथल्या निसर्गोपचार आश्रमाच्या 81व्या स्थापना दिवस कार्यक्रमात ते काल बोलत होते. महात्मा गांधीजींनी स्थापन केलेल्या निसर्गोपचार आश्रमाने शारीरिक मानसिक आरोग्याबरोबरच ग्रामीण विकासातही मोलाचं योगदान दिलं असं उपराष्ट्रपती म्हणाले.

**<u>केरळ विधानसभा</u>**

केरलम विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया आज संध्याकाळी संपणार आहे. निवडणुकीसाठी उमेदवार आज दुपारी 3 वाजेपर्यंत आपले उमेदवारी अर्ज दाखल करू शकतात. उमेदवारी अर्जांची छाननी उद्या केली जाईल, तर उमेदवारांना आपले अर्ज मागे घेण्यासाठी 26 मार्चपर्यंतची मुदत असेल. आतापर्यंत केरलममधल्या 140 मतदारसंघांसाठी 341 उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

**<u>प.बंगाल-मतदार यादी</u>**

भारतीय निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेअंतर्गत पश्चिम बंगालची पहिली पूरक मतदार यादी आज प्रकाशित करण्यात येईल, असं पश्चिम बंगालचे मुख्य निवडणूक अधिकारी मनोज कुमार अग्रवाल यांनी सांगितलं आहे. या यादीमध्ये अशा मतदारांची नावे समाविष्ट असतील, ज्यांची कागदपत्रे 'निर्णयाधीन यादी'मध्ये प्रलंबित होती, परंतु आता त्यांची पूर्णपणे पडताळणी करण्यात आली आहे.

**निवडणूक आयोग कर्मचारी हल्ला**

पश्चिम बंगालमधील पश्चिम बर्धमान जिल्ह्यांतर्गत दुर्गापूर इथं, सरकारी इमारतींच्या भिंतींवरून राजकीय प्रचाराचं लिखाण हटवत असताना निवडणूक आयोगाच्या दोन कर्मचाऱ्यांवर तृणमूल काँग्रेसच्या समर्थकांनी काल हल्ला केला. भारतीय जनता पक्षानं या घटनेचा तीव्र शब्दांत निषेध केला असून, सत्ताधारी पक्षाच्या कृतींविरोधात आवाज उठवल्याबद्दल आपल्या दोन कार्यकर्त्यांनाही मारहाण करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

**शहीद दिवस**

'मेरा युवा (MY) भारत' आज 'शहीद दिवस' निमित्त देशभरात पदयात्रा आयोजित करणार आहे. माझा भारत, माझी जबाबदारी अशी आजच्या दिवसाची मध्यवर्ती संकल्पना आहे. स्वातंत्र्यसैनिक - भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव-यांच्या बलिदानाप्रती आदरांजली वाहण्याच्या उद्देशाने ती आयोजित केली आहे. अशी माहिती युवक कार्य आणि क्रीडा मंत्रालयाने दिली. या पदयात्रा देशातील सर्व 763 जिल्ह्यांमध्ये आयोजित केल्या जातील.

**इराण-इशारा**

अमेरिकेने इराणच्या वीज प्रकल्पांवर हल्ला केला, तर होर्मुझची सामुद्रधुनी पूर्णपणे बंद केली जाईल आणि इस्रायल तसंच या प्रदेशातील आखाती देशांची ऊर्जा पायाभूत सुविधा, जिथं अमेरिकन तळ आहेत, ती लक्ष्य करण्यात येतील, असा इशारा इराणनं दिला आहे. सध्या होर्मुझची सामुद्रधुनी केवळ शत्रूंसाठी बंद आहे, मात्र अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी त्यांच्या धमक्यांवर कृती केली, तर ती पूर्णपणे बंद केली जाईल, असं खतम अल-अंबिया केंद्रीय मुख्यालयाचे प्रवक्ते, इब्राहिम झोल्फघारी यांनी म्हटल्याचं इराणच्या सरकारी माध्यमांनी उद्धृत केलेल्या निवेदनात सांगण्यात आलं आहे.

**नेतन्याहू**

पश्चिम आशियातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर इराण जगासाठी धोका निर्माण करत असून जागतिक नेत्यांनी इराणचा सामना करण्यासाठी इस्रायल आणि अमेरिकेसोबत सामील होण्याचे आवाहन इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी केलं आहे. इराणनं केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यांचं स्वरुप पाहता तेहरानकडून व्यापक जागतिक धोका दिसून येतो, असे ते म्हणाले. काल इराणने दक्षिण इस्रायलमधील अराद आणि दिमोना शहरांवर क्षेपणास्त्रे टाकली, यामध्ये 100 हून अधिक लोक जखमी झाले आणि निवासी भागांचंही नुकसान झालं आहे. या हल्ल्यानंतर पंतप्रधान नेतान्याहू यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना हे विधान केलं. इस्रायलच्या पंतप्रधानांनी काल 'अराद' इथं हल्ल्याच्या ठिकाणाला भेट दिली. इराणच्या हल्ल्याचे लक्ष्य दिमोना शहरापासून 13 किमी अंतरावर असलेली एक अणुभट्टी होती असं वृत्त विविध प्रसारमाध्यमांनी दिलं आहे.

**मंत्रालय**

देशभरात अत्यावश्यक इंधनांचा तुटवडा नसल्याचा पुनरुच्चार केंद्र सरकारने केला आहे. देशातील तेल शुद्धीकरण प्रकल्प उच्च क्षमतेने कार्यरत असून, पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. किरकोळ विक्री केंद्रांवरही इंधनाची कमतरता नाही, असं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. राज्यांना व्यावसायिक एलपीजीचा अतिरिक्त पुरवठा करण्यात आला असून, शैक्षणिक संस्था आणि रुग्णालयांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांना प्राधान्य दिलं जात असल्याचं या निवेदनात म्हटलं आहे.

**गॅस पुरवठा**

दरम्यान महाराष्ट्र राज्यातील हॉटेल, उपाहारगृहांसाठी आता 20 टक्के अतिरिक्त गॅस पुरवठा केला जाणार असल्याची माहिती राज्याचे अन्न, नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी दिली आहे.

**भारत विमान**

पश्चिम आशियाकडे जाणाऱ्या अनेक मार्गांवरील विमान सेवा अद्यापही मर्यादित असल्या तरी एअर इंडिया आणि एअर इंडिया एक्सप्रेस आज नियोजित आणि अनियोजित अशी 30 विमान उड्डाणं करणार आहेत. यामध्ये भारत आणि सौदी अरेबिया दरम्यान एकूण 10 विमान उड्डाणं होतील. याशिवाय मस्कत, रियाध तसंच संयुक्त अरब अमिरातीमधील दुबई, अबुधाबी आणि शारजाहसाठी विमान उड्डाणं होतील. दरम्यान, उत्तर अमेरिका, युरोप, ऑस्ट्रेलिया आणि इतर प्रदेशांसाठी एअर इंडियाची सर्व विमान उड्डाणं वेळापत्रकानुसारच सुरू राहतील.

**खाण लिलाव**

केंद्रीय कोळसा आणि खाण मंत्री जी. किशन रेड्डी खनिज पट्ट्यांच्या लिलावाच्या सातव्या टप्प्याचा आज शुभारंभ करतील. यामध्ये विविध राज्यांमधील 19 पट्टे विक्रीसाठी उपलब्ध केले जातील.या पट्ट्यांमध्ये स्वच्छ ऊर्जा, प्रगत तंत्रज्ञान, खते आणि सामरिक उद्योग यांसारख्या क्षेत्रांसाठी आवश्यक असलेल्या विविध प्रकारच्या खनिजांचा समावेश आहे. हा लिलाव पारदर्शक, दोन-टप्प्यांच्या चढत्या लिलाव प्रक्रियेद्वारे ऑनलाइन पद्धतीनं आयोजित केला जाईल, असं खाण मंत्रालयानं सांगितलं आहे.

**दिल्ली अर्थसंकल्प**

दिल्ली विधानसभेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन आजपासून सुरू होत आहे. हे अधिवेशन 25 मार्चपर्यंत चालणार आहे. या अधिवेशनादरम्यान कृत्रिम बुद्धिमत्तेमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करणारी दिल्ली विधानसभा ही देशातील पहिली विधानसभा ठरणार आहे. 'विधान साथी' या कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित 'चॅटबॉट' चा वापर विधानसभा सदस्यांना करता येणार आहे. यामध्ये विधेयकं, कायदे आणि धोरणात्मक बाबींच्या विश्लेषणासाठी अचूक माहितीचं समावेश करण्यात आला  आहे.

**खेलो इंडिया**

छत्तीसगड सरकारच्या क्रीडा आणि युवा कल्याण विभागानं 'खेलो इंडिया आदिवासी क्रीडा स्पर्धांचं यजमानपद स्वीकारल्याची घोषणा केली आहे. या क्रीडा स्पर्धांचे सामने रायपूर, जगदलपूर आणि सुरगुजा या तीन सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाच्या शहरांमध्ये आयोजित केले जातील; ही तिन्ही शहरं छत्तीसगडच्या आदिवासी बहुल भागातील विविधता आणि समृद्ध वारशाचे यथार्थ दर्शन घडवतात. 25 मार्च ते 3 एप्रिल या कालावधीत होणाऱ्या या स्पर्धेमध्ये छत्तीसगडमध्ये 2 हजार 300 हून अधिक खेळाडू सहभागी होणार आहेत. या स्पर्धेत दोन मुख्य श्रेणींतर्गत 9 क्रीडा प्रकारांचा समावेश असेल.

**'स्पॅनिश-पॅरा-बॅडमिंटन**

स्पेनमधील व्हिटोरिया इथं दिव्यांगांसाठी 16 ते 22 मार्च या कालावधीत पार पडलेल्या 'स्पॅनिश पॅराबॅडमिंटन' स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी वर्चस्व गाजवलं. यामध्येप्रमोद भगतनं दोन सुवर्ण आणि एक रौप्य पदक पटकावलं तर सुकांत कदम याने एक सुवर्णआणि एक रौप्य पदक पटकावलं. अंतिम फेरीत त्यांना त्यांचेच भारतीय सहकारी नितेश कुमार आणि रुथिक रघुपती यांच्याकडून पराभव पत्करावा लागल्याने त्यांना उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.